## राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत - भात उत्पादन कार्यक्रम सन 2016-17

## मार्गदर्शक सूचना

<u>प्रस्तावना-</u>

राज्यात सन 2014-15 या वर्षापासून केंद्र शासनाने पिक विकासाच्या योजनांची अंमलबजावणी विविध मिशन स्वरुपात राबविण्याचे धोरण निश्चीत केले आहे.राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात हे अभियान एकूण 8 जिल्हयात राबविण्यात येणार आहे.या जिल्हयाव्यतिरिक्त राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत भात उत्पादन कार्यक्रम 9 जिल्हयामध्ये राबवयाचा आहे.सदरचा कार्यक्रम प्रकल्पाधारित तत्वावर राबविण्यात यावा.कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करीता खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

- **प्रकल्पाची निवड व पुर्वतयारी** :-

पिकाच्या क्षेत्रानुसार तसेच जेथे क्षेत्र वाढीस व उत्पादकता वाढीस वाव आहे याचा विचार करुन तालुकानिहाय/मंडळनिहाय राबवावयाचे प्रकल्पांची संख्या निश्चित करावी व संबंधित क्षेत्रिय अधिका-यांना तसे कळविण्यात यावे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयांतील ज्या तालुक्यांत पिकाचे क्षेत्र जास्त आहे परंतु उत्पादकता कमी आहे आणि क्षेत्र कमी परंतु उत्पादकता सरासरीपेक्षा जास्त आहे अशा तालुक्यांची प्राधान्याने प्रकल्पांतर्गत निवड करावी. अशा प्रकारे निवडलेल्या तालुक्यातील मंडळाची व गावांची निवड करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. जिल्हयांतील सर्व तालुक्यामध्ये हा प्रकल्प राबविणे बंधनकारक नाही. मात्र मागील वर्षी निवडण्यात आलेली / गटांची निवड पुन्हा करण्यात येऊ नये. प्रत्येक वेळी नविन क्षेत्र आणि गटांची निवड करावी.

**मुलभूत सर्वेक्षण करणे**.

उत्पादन व उत्पादकता आधारीत प्रकल्पांची निवड व प्रकल्प अहवाल तयार करताना खालील बाबींचे मुलभुत सर्वेक्षण करण्यात यावे.

- निवडलेल्या क्षेत्रातील पिकनिहाय क्षेत्राचा तपशील प्रकल्पात दर्शविणे.
- पिकनिहाय व वाणनिहाय क्षेत्र व वाण निहाय उत्पादकता प्रकल्पात दर्शविणे.
- जमीन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाष व सुक्ष्ममुलद्रव्ये यांचा तपशील प्रकल्पात दर्शविणे
- पिकनिहाय निविष्ठा वापराचे प्रमाण व शिफारस प्रमाणे मात्रा व प्रत्यक्षात वापराचा तपशील
- शेतकरी समुह/गटाची निवड करणे व प्रकल्पात सहभागी होण्याकरीता त्यांची संमती घेणे.

**योजनेतील घटक** :-

१. **बियाणे वितरण** :

भात पिकाच्या उत्पादकता वाढीसाठीनवीन महत्व लक्षात घेऊन १० वर्षाच्या आतील प्रसारित वाणांचे प्रमाणित बियाणे ५० टक्के अनुदानावर वितरीत करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. भात पिकाच्या सुधारित वाणाच्या बियाण्यास रु.१०००/- प्रती क्विंटल तर संकरित वाणाच्या बियाण्यास रु.५०००/- प्रती क्विंटल प्रमाणे कमाल अनुदान मर्यादा आहे.

१.१ जिल्हानिहाय वितरीत करावयाच्या प्रमाणित बियाण्यांचा तपशील सहपत्रीत करण्यात येत आहे. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाबीज यांच्याबरोबर दररोज समन्वय ठेवून लक्षांकाप्रमाणे संबंधित तालुक्यामध्ये बियाणे वेळेत वितरीत केले जाईल याबाबत स्थानिक पातळीवर कार्यपद्धती तयार करावी. **विहित केलेल्या प्रमाणानुसार अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना देणे बंधनकारक राहील**.

१.२ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी स्तरावरुन लक्षांकनिहाय व पिकनिहाय लागणाऱ्या बियाण्यांची मागणी पुरवठादार संस्थांना तात्काळ दयावी. बियाणे पुरवठादार संस्थांनी त्यांचे वितरकामार्फत प्रमाणित बियाणे वाटप करावयाचे आहे.

१.३ पुरवठादार संस्थांना यांच्या वितरकांनी बियाणे विक्री अनुदानित दराने खुल्या पध्दतीने करावयाची आहे. शेतकऱ्यांना बियाणे घेण्यासाठी जास्त अंतर जावे लागणार नाही यादृष्टिने जास्तीत जास्त वितरकांकडे बियाणे उपलब्ध होईल याची दक्षता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व बियाणे पुरवठादार संस्थांनी घ्यावी.

१.४ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका निहाय निश्चित केलेल्या लक्षांकानुसार पुरवठादार संस्थांनी त्या तालुक्यातील आपल्या अधिकृत वितरकांकडे प्रमाणित बियाणे उपलब्ध करुन द्यावे व वाणनिहाय किती बियाणे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे याची वितरकनिहाय माहिती संबधीत तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना द्यावी. लाभार्थीनिहाय वितरण, वितरकाची साठा नोंदवही व विक्री बिलांची तपासणी ताकृअ यांनी वेळोवेळी करावी.

१.५ वितरकांकडे दर्शनी भागावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत प्रमाणित बियाणे अनुदानावर उपलब्ध असल्याचा फलक लावावा. तसेच वाणनिहाय दर, अनुदान व अनुदान वजा जाता पॅकींगनिहाय येणारी किंमत याची माहिती संबंधित वितरकाने फलकावर प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

१.६ बियाणे घेण्यास येणाऱ्या शेतकऱ्याचे नाव, प्रवर्ग, गाव, गट क्रमांक, क्षेत्र याबाबतची माहिती घेऊन व त्याची खात्री करुन संबधित वितरकांनी अनुदान वजा जाता येणारी किंमत घेऊन शेतकऱ्याला बियाणे वितरीत करावे. कोणत्याही परीस्थीतीत अनुदान वजा जाता शेतकऱ्याकडुन वसुल करावयाची रक्कम कृषि विभागाकडुन दिली जाणार नाही याची पुरवठादार संस्थांनी नोंद घ्यावी. ती रक्कम शेतकऱ्याकडून वसुल करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थांच्या वितरकांची राहिल.

१.७ वितरीत केलेल्या बियाण्याची खातरजमा होण्यासाठी संबंधित वितरकाने प्रवर्गनिहाय लाभार्थी याद्या तालुका कृषी अधिकारी यांचेकडे सादर कराव्यात. तालुका कृषी अधिकारी व बियाणे पुरवठादार संस्थांकडून संयुक्त बियाणे वितरण अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय कृषी अधिकारी यांनी बियाणे वितरण प्रमाणपत्र जि अ कृ अ कार्यालयास पाठवावे. सदर वितरण प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हास्तरावरुन संबधित पुरवठादार संस्थांना अनुदान वितरीत करण्यात यावे .

१.८ पुरवठादार संस्थांकडून वितरकांकडे बियाणे प्राप्त झाल्यानंतर गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी लॉट निहाय नमुने घेऊन शासकीय बीज परीक्षण प्रयोगशाळेकडून तपासून घ्यावेत. गुणवत्ता तपासणी प्रकरणी संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांचे पालन करावे.

१.९ सदर घटकाचे प्रभावी संनियंत्रणाची जबाबदारी उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील.

**२. तंत्रज्ञान प्रात्यक्षिके**

**२.१ सुधारित भात लागवड तंत्रज्ञान** :

भात पिकाच्या उत्पादकता वाढीसाठी आवश्यक तंत्रज्ञानाबाबत कृषी विद्यापीठांच्या शिफारशी व मार्गदर्शनानुसार राज्यात योजनेंतर्गत निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये अवलंब करावयाचे सुधारित तंत्रज्ञान निश्चित केले आहे. तसेच पिकाच्या उत्पादनावर परिणाम न करता उत्पादन खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने आयुक्तालयाने दि. २३ एप्रिल २०१६ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकामध्ये सर्वसाधारण तसेच पिकनिहाय सूचना देण्यात आलेल्या आहेत. कृषी विद्यापीठांच्या शिफारशी व मार्गदर्शनानुसार प्रात्यक्षीकामध्ये अवलंब करावयाचे तंत्रज्ञान आणि केंद्र शासनाने तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांचे मापदंड खालीलप्रमाणे आहेत. प्रात्यक्षिक प्रकारनिहाय अवलंब करावयाचे तंत्रज्ञान व वापरावयाच्या निविष्ठांचा तपशील सहपत्रीत करण्यात येत आहे.

**भात** -

| **अ.क्र.** | **प्रात्यक्षिक प्रकार** | **मापदंड (रु. प्रती हेक्टर)** |
|---|---|---|
| 1. | श्री पद्धतीने सुधारित वाणांची लागवड | १५७२ |
| 2. | श्री पद्धतीने संकरित वाणांची लागवड | २६४५ |
| 3. | चारसूत्री पद्धतीने लागवड | २१४७ |
| 4. | यांत्रिक पुनर्लागवड पद्धतीने लागवड | ३२०७ |
| 5. | गादी वाफ्यावर टोकन पद्धतीने (सगुणा भात तंत्र) लागवड | २९७५ |

टिप -१. भात पिकाच्या बांधावर तूर लागवड ही बाब मोठ्या प्रमाणात घेण्याबाबत केंद्र शासनाचे निर्देश असल्याने तसेच कडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढवण्याच्या उद्देशाने प्रत्येक प्रात्यक्षिकात सदर बाबीचा समावेश करण्यात आला आहे.

२. भात तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांचा लक्षांक खरीप व उन्हाळी हंगामासाठी असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गरजेनुसार कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांच्या सल्ल्यानुसार हंगामनिहाय प्रात्यक्षिकांचे नियोजन करावे.

२.२ **तालुका, गाव व प्रकल्प क्षेत्र निवड**

- केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कृषी विद्यापीठे/ संशोधन संस्थांच्या तांत्रिक सहकार्याने समूह प्रात्यक्षिके आयोजित करावयाची आहेत.
- राज्यात आत्मा यंत्रणा, नाबार्ड, एशियन डेव्हलपमेंट बँक, कृषी समृद्धी प्रकल्प (केम प्रोजेक्ट), महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्प (MACP), छोट्या शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघ (SFAC) तसेच स्वतःहून शेतकऱ्यांनी एकत्रित येवून स्थापन केलेली शेतकरी उत्पादक कंपनी किंवा शेतकरी गट निर्माण झाले आहेत.

- सदर शेतकरी समूहांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रात्यक्षिक प्रकल्प शेतकरी उत्पादक कंपनी/गटाच्या सहकार्याने प्राधान्याने राबविण्यात यावेत. यामुळे सुधारित तंत्रज्ञाचा व्यापक प्रमाणात व प्रभावी वापर होण्यास मदत होते. प्रकल्प क्षेत्र व लाभार्थी गट निवडीसाठी जि.अ.कृ.अ. यांनी संयुक्तपणे कार्यवाही करावी.जेथे उत्पादक कंपणी/गट स्थापन झाले नाहीत तेथे नव्याने आत्मा अंतर्गत गटांची नोंदणी करुन कार्यक्रम राबवावा.
- तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांसाठी जिल्ह्यांच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी उत्पादकता असलेल्या तालुक्याची निवड करावी. तालुक्यातील प्रकल्प क्षेत्र निवडताना त्या तालुक्यातील सर्वात कमी उत्पादकता असलेल्या मंडळाची निवड करून त्यात गावाची व प्रकल्प क्षेत्राची निवड करुन प्रकल्प राबवावा.
- प्रात्यक्षिक प्रकल्प १०० हेक्टर क्षेत्राच्या समूहात राबवावयाचे आहेत. प्रात्यक्षिक प्रकल्पासाठी पुरेसे क्षेत्र उपलब्ध होत नसल्यास किमान 20 हेक्टरचे लघुगट करून कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.
- प्रकल्प क्षेत्राशी संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांना प्रकल्पाचे नोडल अधिकारी म्हणून घोषित करून त्यांचे संपर्क क्रमांक आयुक्तालयास कळविण्यात यावेत.
- प्रकल्पासाठी निवड केलेल्या क्षेत्राचे मंडळ कृषि अधिकारी यांनी पायाभूत सर्वेक्षण काम पूर्ण करून प्रकल्पातील उत्पादकतेच्या लक्षांकांसह प्रकल्प आराखडा तयार करून त्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मान्यता प्रदान करावी.
- **२.३ लाभार्थी गट निवड व गटाच्या जबाबदाऱ्या** :
- **क**ृषी सहाय्यकाने प्रकल्प क्षेत्रातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनीची व लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायतीच्या सहभागाने करावी. प्रकल्प क्षेत्रामध्ये शेतकरी उत्पादक कंपनी नसल्यास शेतकरी गटाची व लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायतीच्या सहभागाने करावी.
- विहित केलेल्या प्रमाणानुसार अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीच्या तसेच महिला लाभार्थ्यांचा समावेश करणे बंधनकारक राहील.
- प्रती लाभार्थी कमीत कमी ०.४० हेक्टर क्षेत्रावर प्रात्यक्षिकाचे आयोजन करावे.
- शेतकरी गटाने/ उत्पादक कंपनीने सगुण भात तंत्र पद्धतीवर आधारित प्रात्यक्षिकासाठी लाभार्थी निवडताना दोन्ही हंगामात घेण्याची तयारी असणाऱ्या व त्याप्रमाणे सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांचीच निवड करावी.
- प्रात्यक्षिक क्षेत्रातील पिकांची पूर्वमशागत, बीजप्रक्रिया, पेरणी/ लावणी, आंतरमशागत, सिंचन व्यवस्था, विशेष तंत्रांचा वापर, पीक संरक्षण, काढणी व मळणी या सर्व कामांचे नियोजन लाभार्थी गटास तयार करून द्यावे.
- प्रात्यक्षिकासाठी आवश्यक सर्व निविष्ठांविषयी शेतकऱ्यांना अवगत करावे व त्यापैकी **अनुदानित निविष्ठा पुरवठादार संस्थेमार्फत वेळापत्रकानुसार सरळ उत्पादक कंपन्यांच्या/ गटांच्या ताब्यात द्याव्यात** तर इतर निविष्ठांची खरेदी उत्पादक कंपन्यांनी/गटाने वेळेत करणे

बंधनकारक राहील. प्राप्त अनुदानित निविष्ठांचे निवडलेल्याच लाभार्थ्यांना वितरण करणे बंधनकारक राहील. निविष्ठा वितरण लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत करावे. कृषी सहाय्यकाने निवडलेल्या लाभार्थ्यांना अनुदानित निविष्ठा वाटप होतील याची दक्षता घ्यावी. अनुदानित तसेच विनाअनुदानीत निविष्ठांच्या नोंदी प्रात्यक्षिक नोंदवहीमध्ये घ्याव्यात.

- प्रात्यक्षिकांतर्गत प्रती हेक्टरी आर्थिक मर्यादेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास सदर खर्च संबधित लाभार्थ्याने करावा.
- प्राप्त निविष्ठांचा वापर नियोजित प्रत्याक्षिकासाठीच केला जाईल व त्यांचा गैरवापर होणार नाही याबाबत खातरजमा करावी.
- प्रात्यक्षिकातील तंत्राचा अवलंब करण्यास उत्सुक असलेल्या लाभार्थ्यांचीच निवड करावी .

**२.४ प्रात्यक्षिकासाठी बियाणे** :

**२.४.१** ज्या प्रात्यक्षिक प्रकारामध्ये अनुदानित बियाणे ही बाब समाविष्ट आहे तेथे पीक प्रात्यक्षिकासाठी १० वर्षाच्या आतील प्रसारित वाणांचे प्रमाणित बियाणे १०० टक्के अनुदानावर वितरीत करावयाचे आहे. महाबीजकडील बियाणे उपलब्धता विचारात घेऊन प्रात्यक्षिकांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार बियाण्याची मागणी महाबीज कडे करावी. प्रात्यक्षिक प्रकल्पामध्ये वाटप करावयाचे बियाणे पुरवठादार संस्थांमार्फत तालुका कृषि अधिका-यांनी निवडलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी / गटास पेरणीपूर्वी पुरवठा करावा. बियाणे पुरवठादार संस्थांनी प्रात्यक्षिकासाठी पुरवठा करावयाच्या बियाणे पिशवीवर "फक्त प्रात्यक्षिकासाठी" असे दर्शनी भागात नमूद करावे. २.४.२ भात पिकाच्या बांधावर तूर लागवड हि बाब मोठ्या प्रमाणात घेण्याबाबतकेंद्र शासनाचे निर्देश असल्याने तसेच कडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने प्रत्येक प्रात्यक्षिकात सदर बाबीचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी प्रती हेक्टर १.२५ किलो या प्रमाणात तूर पिकाचे बियाणे १००% अनुदानावर पुरवावे.

**२.५ बीजप्रक्रिया** :

यावर्षी कृषी विभागाच्या जैविक प्रयोगशाळामार्फत पीक गटास आवश्यक द्रवरूप जैविक खते/ जैविक खते संघ (liquid consortia) तयार करण्यात येत असून सदर खतांची बीजप्रक्रिया केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन पिकांच्या उत्पादकतेत वाढ होते. प्रात्यक्षिकामध्ये बीजप्रक्रिया बंधनकारक असून त्यासाठी सदर जैविक खते गटांना १०० टक्के अनुदानावर पुरवावी. यासाठी पेरणीच्या वेळेत जैविक खते उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रतिकिलो बियाण्यास १० मिली या प्रमाणात प्रात्यक्षिकासाठीची आवश्यक मागणी नजिकच्या शासकीय जैविक प्रयोगशाळेकडे नोंदवून त्याची प्रत कृषी उपसंचालक, प्रयोगशाळा कृषी आयुक्तालय पुणे यांचेकडे पाठवावी. शासकीय प्रयोगशाळेतील जैविक खते संपल्यानंतर कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्रातील आणि तदनंतर महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडाळाकडुन जैविक खतांचा पुरवठा करावा.

**२.६ एकात्मिक कीड व्यवस्थापन**:

**२.६.१** प्रात्यक्षिक क्षेत्रातील भात पिकावर येणाऱ्या संभाव्य किडी व रोगांबाबत सखोल माहिती लाभार्थ्यास देण्यात यावी. पिकाच्या विविध अवस्थेमध्ये येणाऱ्या किडींचे सर्वेक्षण करण्याबाबत लाभार्थ्यास प्रशिक्षित करावे तसेच क्रॉपसॅप अंतर्गत नियुक्त केलेल्या किडरोग सर्वेक्षकांची मदत घेण्यात यावी.. किडरोग सर्वेक्षणाच्या आधारे दिलेल्या सल्ल्यानुसारच किडनाशकांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यास प्रवृत्त करावे. यासाठी कृषी विद्यापीठाने पीकनिहाय व किडरोगनिहाय केलेल्या शिफारशींचा अवलंब करावा तसेच लेबल क्लेम प्रमाणेच किडनाशकाची निवड करावी.

अनुदानावर द्यावयाची किडनाशके महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून वेळेत उपलब्ध करून घ्यावीत आणि तात्काळ लाभार्थी गटाचे ताब्यात द्यावीत तसेच लाभार्थी निहाय वितरण नोंदवही जतन करावी. पुरवठा केलेल्या किडनाशकांचा वापर ज्या किडरोगासाठी करण्यात आला त्याबाबतच्या नोंदी प्रात्यक्षिक नोंदवहीत घ्याव्यात. तसेच रासायनिक किडनाशकावरील खर्च कमी करण्यासाठी आयुक्तालयाचे दि. २३ मे २०१६ च्या " पिकांचे उत्पादनावर परिणाम न करता उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना " बाबतच्या परिपत्रकातील सूचनांचा अवलंब करावा.

**२.६.२ तणनाशकांचा वापर**:

भात पिकाच्या उत्पादन वाढीसाठी राबवावयाच्या तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांमध्ये तण व्यवस्थापनासाठी तणनाशकांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे. उगवणी पूर्व आणि उगवणीनंतर वापरावयाच्या तणनाशकांचा काळजीपूर्वक अभ्यास करून तणनाशके फवारणीचे तंत्र लाभार्थ्यांना समजावून सांगावे. अनुदानावर द्यावयाची तणनाशके महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून (MAIDC) वेळेत उपलब्ध करून घ्यावीत आणि तात्काळ लाभार्थी गटाचे ताब्यात द्यावीत तसेच लाभार्थीनिहाय वितरण नोंदवही जतन करावी. पुरवठा केलेल्या तणनाशकांचा वापर ज्या तणांसाठी करण्यात आला त्याबाबतच्या नोंदी प्रात्यक्षिक नोंदवहीत घ्याव्यात.

**२.७ कृषी औजारे (यांत्रिकी व** SRT **प्रात्यक्षिके**) :-

भात पिकाच्या उत्पादन वाढीसाठी सुधारित व नाविन्यपूर्ण लागवड पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक असल्याने "श्री" पद्धतीने, चारसूत्री पद्धतीने, यांत्रिक पुनर्लागवड पद्धतीने तसेच गादी वाफ्यावर टोकन पद्धतीने (सगुणा भात तंत्र- एस.आर.टी.) लागवड करण्याची प्रात्यक्षिके आयोजित करावयाची आहेत. या लागवड पद्धतीमध्ये युरिया ब्रिकेट खोचण्याचे औजार, मॅट नर्सरीसाठी फ्रेम, टोकण साचा (एस.आर.टी.) या लहान औजारांचा वापर अनिवार्य असल्याने सदर औजारे ५० टक्के अनुदानावर पुरविण्यात यावीत.

**२.८ मनुष्यबळ विकास** (SRT **प्रात्याक्षिके**) :-

- खरीप हंगामासाठी ऑगस्ट-सप्टेंबर, रब्बी हंगामासाठी डिसेंबर-जानेवारी आणि उन्हाळी हंगामात फेब्रुवारी-मार्च महिन्यामध्ये प्रात्यक्षिक प्लॉटवर शेतीदिनाचे आयोजन करून परिसरातील शेतकऱ्यांच्या भेटी घडवून आणाव्यात. शेती दिनास स्थानिक लोकप्रतिनिधिंना बोलवावे.

  शेतीदिनासाठी प्रति हेक्टर रु. २५० प्रमाणे खर्च करण्यात यावा. याद्वारे राबविलेल्या तंत्रज्ञानास व्यापक प्रसिद्धी द्यावी.

**२.९ प्रात्यक्षिक अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण सूचना**

- लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर जाहीर करावी तसेच राज्य शासनाच्या वेबसाईटवर भरावी. ( महाऑनलाईन )
- प्रात्यक्षिक प्लॉट शेजारी पारंपरीक पध्दतीवर आधारीत तुलनात्मक प्लॉट घेण्यात यावा.
- सदर प्रात्यक्षिके शक्यतो रस्त्यालगत व त्या संबंधित गावातील जमिनीचा प्रकार/सुपीकता यांचे प्रतिनिधिक असावीत. प्रात्यक्षिकाबाबतचा फलक रस्त्याच्या कडेला प्लॉटशेजारी दर्शनी भागात लावण्यात यावा व त्यावर खालील माहिती नमूद करावी.

➢ समाविष्ट गावाचे नाव/गावांची नावे, गटाचे नाव, शेतकरी संख्या, पीक व वाण, प्रात्यक्षिकाचा प्रकार , प्रति हेक्टर बियाणे वापर व पेरणीचे अंतर, पेरणीची तारीख, वापरलेल्या निविष्ठांचा तपशील इ.

- प्रात्यक्षिकासाठीच्या निविष्ठा वेळेपूर्वी लाभार्थी गटास उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ते नियोजन व वेळापत्रक मंडळ कृषि अधिकारी यांनी तयार करावे.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय वितरण केलेल्या व वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात.
- अभियाना अंतर्गत प्रात्यक्षिकासाठी वितरीत करावयाच्या निविष्ठा संदर्भात मागणी, तपासणी व देयक अदायगी या अनुषंगाने संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अद्ययावत मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
- **प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी कृषि सहाय्यकांनी करावी. प्रात्यक्षिकांचे निरिक्षण व अहवालाची जबाबदारी कृषि पर्यवेक्षकावर राहील. प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन उपविभागीय कृषि अधिकारी यांनी करावे यासाठी प्रकल्पनिहाय पीक कापणी प्रयोग आयोजित करावेत.**
- प्रात्यक्षिक घेतलेल्या प्लॉटच्या व कंट्रोल प्लॉटच्या उत्पादनाचा तुलनात्मक अभ्यास करुन मूल्यमापन अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मार्फत कृषि आयुक्तालयास सादर करावा.

3. **यांत्रिकीकरण**

भात पिकाच्या उत्पादनामध्ये वाढ करण्यासाठी आणि उत्पादन खर्चामध्ये बचत करण्यासाठी उपयुक्त असलेल्या यंत्रे/ कृषी औजारांचा वापर वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक कृषी औजारे व यंत्रांबाबतची माहिती तसेच यंत्र चालविण्याबाबतचे कौशल्य इच्छुक शेतकऱ्यांना प्राप्त होण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र व महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे सहकार्याने प्रशिक्षण तसेच प्रात्यक्षिकाचे आयोजन करावे.

3.**१ योजनेंतर्गत मंजूर औजारांचा तपशील**

सन २०१६-१७ साठी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या औजारांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | औजाराचे नाव | अधिकतम अनुदान मर्यादा सर्व शेतकऱ्यांसाठी (किमतीच्या ५० टक्के किंवा अनुदानाच्या रकमेपैकी जे कमी असेल ते) | ज्या योजनेतील मापदंड वापरले ती योजना |
|---|---|---|---|
| १ | स्वयंचलित भात लावणी/ रोवणी यंत्र | ७५००० | राअसुअ |
| २ | रोटाव्हेटर | ३५००० | |
| ३ | ड्रम सीडर | १५०० | |
| ४ | स्वयंचलित भात कापणी यंत्र (रिपर) | ६३००० | |

**यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मापदंडाप्रमाणे** :

| अ.क्र. | औजाराचे नाव | अधिकतम अनुदान मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | अ.ज /अ.जा./महिला / अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी ( राज्य शासनाने निर्धारित केलेल्या किंमतीच्या ५० टक्के किंवा अनुज्ञेय अनुदानाच्या रकमेपैकी जे कमी असेल ते) | इतर शेतकरी ( राज्य शासनाने निर्धारित केलेल्या किंमतीच्या ४० टक्के किंवा अनुज्ञेय अनुदानाच्या रकमेपैकी जे कमी असेल ते) |
| १ | पॉवर टिलर<br>(८ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमता) | ७५००० | ६०००० |
| २ | भात मळणी यंत्र | ६३००० | ५०००० |
| ३ | मिनी राईस मिल | ६० टक्के किंवा कमाल १५०००० | ५० टक्के किंवा कमाल १२५००० |

3.**२ औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यावर जमा करण्याबाबत कार्यपद्धती** (DBT) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यावर जमा (DBT) करण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी निर्देश दिलेले आहेत. तद्अनुषंगाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत औजारे घटकाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | कार्यवाही | कार्यवाही कोणी करावी | आवश्यक अभिलेख/ प्रपत्र |
|---|---|---|---|
| १. | औजारे घटकाबाबत जिल्ह्याला दिलेल्या लक्षांकाच्या अधीन राहून तालुकानिहाय लक्षांक निश्चित करून समाविष्ट औजारांबाबत प्रसिद्धी देणे व शेतकऱ्यांना आवाहन करणे | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | • मार्गदर्शक सुचना<br>• लक्षांक<br>• निधी उपलब्धता |
| २. | केंद्र/राज्य शासनाने मान्यता दिलेल्या व महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे नोंदणी केलेल्या कृषि औजारे उत्पादकांची/ अधिकृत विक्रेता यांची यादी, तांत्रिक तपशील, दर इ. बाबतची संचालक (नि व गु नि ) यांनी निर्गमित केलेली माहिती शेतकऱ्यांना अवगत करणे. | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | • औजारांची यादी<br>• तांत्रिक तपशील<br>• उत्पादक/अधिकृत विक्रेता यादी |
| ४. | शेतकऱ्यांकडून प्राप्त अर्जांची प्राथमिक तपासणी करून तालुकास्तरीय समितीच्या मान्यतेने लाभार्थी निवड करणे व पूर्वसंमती देणे व त्याची प्रत प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांच्याकडे पाठविणे. | तालुका कृषि अधिकारी | • पूर्वसंमती पत्र नमुना |
| ५. | निवड झालेल्या लाभार्थींकडून पूर्वसंमती मिळाल्याची पोहोच घेणे | कृषि सहाय्यक | • पूर्वसंमती पत्र पोहोच नमुना |
| ६. | लाभार्थ्याने पूर्वसंमती मिळाल्यापासून २० दिवसांच्या आत महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने लाभार्थ्याच्या | महाराष्ट्र कृषि उद्योग | |

| अ.क्र | कार्यवाही | कार्यवाही कोणी करावी | आवश्यक अभिलेख/ प्रपत्र |
|---|---|---|---|
| | मागणी/ पसंतीनुसार औजारे उपलब्ध करून देणे आणि लाभार्थ्याने पूर्ण किंमत भरून औजाराची खरेदी करणे | विकास महामंडळ व लाभार्थी | |
| ७. | अनुदान मिळण्यासाठी कृषि सहाय्यकाकडे प्रस्ताव सादर करणे | लाभार्थी | • अनुदान मागणी अर्ज<br>• अनुज्ञेयकाची मूळ प्रत<br>• हमीपत्र<br>• MAIDC प्रमाणपत्र |
| ८. | खरेदीबाबतच्या अनुज्ञेयकासह लाभार्थ्याकडून प्राप्त परिपूर्ण प्रस्तावानुसार औजाराची पडताळणी /मोका तपासणी करून ७ दिवसात ताकृअ यांना अहवाल सादर करणे | मंडळ कृषि अधिकारी | • तपासणी अहवाल |
| ९. | प्राप्त अहवालानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान अदायगीसाठी पात्र लाभार्थींची देयके तयार करून कोषागारास सादर करणे | तालुका कृषि अधिकारी | |
| १०. | संबंधित लाभार्थीच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करणे | संबंधित कोषागार | |
| ११. | लाभार्थीच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा केल्याबाबत पोहोच कोषागाराकडून/ ऑनलाइन पद्धतीने प्राप्त करून घेऊन अभिलेख जतन करणे | तालुका कृषि अधिकारी | |

- औजारे घटकांसाठी दिलेल्या लक्षांकापेक्षा अधिक शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यास तालुकास्तरीय समितीने सोडत (लॉटरी) पद्धतीने लाभार्थी निवड करावी.
- सदर घटकाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रपत्रे व मासिक प्रगती अहवाल सहपत्रीत करण्यात येत आहे.
- कृषी अवजारे व सिंचन साधने यांच्या गुणवत्ता नियंत्रणाबाबत संचालक (निवगुनि) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

<u>योजनेचे सनियंत्रण व मूल्यमापन</u>

विविध <u>स्तरावर खर्चाच्या तपासणीची टक्केवारी खालील प्रमाणे राहिल.</u>

| अ.क्र. | स्तर | टक्केवारी |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | विभागीय कृषि सह संचालक | 0.5 % |
| 2 | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | 1 % |
| 3 | उप विभागीय कृषि अधिकारी | 5 % |
| 4 | तालुका कृषि अधिकारी | 10 % |
| 5 | मंडल कृषि अधिकारी | 50 % |
| 6 | कृषि पर्यवेक्षक | 100 % |

<u>लाभार्थिंची ऑनलाईन माहिती भरणे</u>

राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत - भात उत्पादन कार्यक्रमामध्ये लाभार्थ्यांना निरनिराळ्या बाबीचा लाभ देण्यात येतो. अशा लाभार्थिंची माहिती केंद्र शासनाच्या सुचनेनुसार ऑनलाईन testmisagri.mahaonline.gov.in (mis) माहिती भरावयाची आहे.

प्रत्येक जिल्हयाने व विभागाने दरमहा 5 तारखेपर्यंत बाबनिहाय मासिक प्रगती अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

**स्वाक्षरीत**/-

**कृषि संचालक**

**( विस्तार व प्रशिक्षण )**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे**

| | | राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एकात्मिक भात उत्पादन कार्यक्रम सन 2016-17 ( रु.लाखात. ) | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | बियाणे वितरण ( कमाल मर्यादा- सुधारित वाण रुपये 1000/- प्रति क्विंटल, ) | | | प्रात्याक्षिके | | | | | | | | | | | |
| | | | | | श्री.पध्दतीने सुधारित वाणांची लागवड ( रु.1572/- हे.) | | श्री.पध्दतीने संकरित वाणांची लागवड ( रु.2645/- हे.) | | चारसुत्र पध्दतीने लागवड ( रु.2147/- हे.) | | यांत्रिक पुर्नलागवड पध्दतीने लागवड ( रु.3207/- हे.) | | गादी वाफयावर टोकन पध्दतीने (सगुणा भात तंत्र ) ( रु.2975/- हे.) | | एकूण प्रात्याक्षिके | |
| | | भौतिक लक्ष | | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (हे.) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (हे.) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (हे.) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (हे.) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (हे.) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (हे.) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) |
| | | बियाणे (क्विं) | भौतिक (हे.) | | | | | | | | | | | | | |
| 1 | ठाणे | 1600 | 8000 | 16.0000 | 1100 | 17.2920 | 50 | 1.3225 | 895 | 19.2157 | 150 | 4.81050 | 150 | 4.4355 | 2345 | 47.0762 |
| 2 | पालघर | 1300 | 6500 | 13.0000 | 1200 | 18.8640 | 50 | 1.3225 | 1200 | 25.7640 | 150 | 4.81050 | 200 | 5.9140 | 2800 | 56.6750 |
| 3 | रायगड | 2700 | 13500 | 27.0000 | 1050 | 16.5060 | 50 | 1.3225 | 900 | 19.3230 | 0 | 0.00000 | 200 | 5.9140 | 2200 | 43.0655 |
| 4 | रत्नागिरी | 1500 | 7500 | 15.0000 | 1050 | 16.5060 | 50 | 1.3225 | 1200 | 25.7640 | 0 | 0.00000 | 200 | 5.9140 | 2500 | 49.5065 |
| 5 | सिंधुदुर्ग | 1000 | 5000 | 10.0000 | 1000 | 15.7200 | 50 | 1.3225 | 800 | 17.1760 | 0 | 0.00000 | 80 | 2.3656 | 1930 | 36.5841 |
| 6 | नंदुरबार | 200 | 1000 | 2.0000 | 0 | 0.0000 | 0 | 0.0000 | 300 | 6.4410 | 0 | 0.00000 | 40 | 1.1828 | 340 | 7.6238 |
| 7 | अहमदनगर | 400 | 2000 | 4.0000 | 0 | 0.0000 | 0 | 0.0000 | 300 | 6.4410 | 0 | 0.00000 | 30 | 0.8871 | 330 | 7.3281 |
| 8 | सांगली | 300 | 1500 | 3.0000 | 949 | 14.9183 | 0 | 0.0000 | 300 | 6.4410 | 0 | 0.00000 | 50 | 1.4785 | 1299 | 22.8378 |
| 9 | कोल्हापूर | 1000 | 5000 | 10.0000 | 950 | 14.9340 | 0 | 0.0000 | 600 | 12.8820 | 0 | 0.00000 | 50 | 1.4785 | 1600 | 29.2945 |
| एकुण | | 10000 | 50000 | 100 | 7299 | 114.7403 | 250 | 6.6125 | 6495 | 139.4477 | 300 | 9.6210 | 1000 | 29.5700 | 15344 | 299.9914 |

| | | राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एकात्मिक भात उत्पादन कार्यक्रम सन 2016-17 ( रु.लाखात. ) | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | यांत्रिकीकरण | | | | | | | | | | | | | | | | |
| | | पॉवर टिलर | | स्वयंचलित भात लावणी/ रोवणी यंत्र | | रिपर | | थ्रेशर | | ड्रमसिडर | | मिनी राईस मिल | | सिड डेसिंग ड्रम | | एकूण यांत्रिकीकरण | | एकूण जिल्हानिहाय कार्यक्रम |
| | | लक्ष भौतिक (संख्या) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (संख्या ) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (संख्या ) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (संख्या) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (संख्या) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (संख्या) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (संख्या) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष भौतिक (संख्या) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) | लक्ष आर्थीक (रु.लाखात) |
| 1 | ठाणे | 122 | 91.5000 | 3 | 2.2500 | 10 | 6.3000 | 8 | 5.0400 | 12 | 0.2280 | 4 | 6.0000 | 2 | 0.1000 | 161 | 111.418 | 174.4942 |
| 2 | पालघर | 121 | 90.7500 | 4 | 3.0000 | 10 | 6.3000 | 8 | 5.0400 | 12 | 0.2280 | 4 | 6.0000 | 2 | 0.1000 | 161 | 111.418 | 181.0930 |
| 3 | रायगड | 80 | 60.0000 | 2 | 1.5000 | 8 | 5.0400 | 7 | 4.4100 | 9 | 0.1710 | 4 | 6.0000 | 2 | 0.1000 | 112 | 77.221 | 147.2865 |
| 4 | रत्नागिरी | 40 | 30.0000 | 1 | 0.7500 | 8 | 5.0400 | 5 | 3.1500 | 7 | 0.1330 | 4 | 6.0000 | 2 | 0.1000 | 67 | 45.173 | 109.6795 |
| 5 | सिंधुदुर्ग | 40 | 30.0000 | 1 | 0.7500 | 6 | 3.7800 | 5 | 3.1500 | 7 | 0.1330 | 2 | 3.0000 | 2 | 0.1000 | 63 | 40.913 | 87.4971 |
| 6 | नंदुरबार | 10 | 7.5000 | 1 | 0.7500 | 4 | 2.5200 | 5 | 3.1500 | 7 | 0.1330 | 3 | 4.5000 | 1 | 0.0500 | 31 | 18.603 | 28.2268 |
| 7 | अहमदनगर | 5 | 3.7500 | 1 | 0.7500 | 2 | 1.2600 | 2 | 1.2600 | 5 | 0.0950 | 2 | 3.0000 | 1 | 0.0500 | 18 | 10.165 | 21.4931 |
| 8 | सांगली | 20 | 15.0000 | 1 | 0.7500 | 5 | 3.1500 | 4 | 2.5200 | 7 | 0.1330 | 3 | 4.5000 | 1 | 0.0500 | 41 | 26.103 | 51.9408 |
| 9 | कोल्हापूर | 60 | 45.0000 | 1 | 0.7500 | 5 | 3.1500 | 6 | 3.7800 | 10 | 0.1900 | 4 | 6.0000 | 2 | 0.1000 | 88 | 58.970 | 98.2645 |
| एकुण | | 498 | 373.5000 | 15 | 11.2500 | 58 | 36.5400 | 50 | 31.5000 | 76 | 1.4440 | 30 | 45.0000 | 15 | 0.7500 | 742 | 499.9840 | 899.9754 |